महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९

# महाराष्ट्र विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे) अधिनियम, १९८६

( दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित )

**Maharashtra Act No. XXIX of 1986**

# Maharashtra Departmental Inquiries (Enforcement of Attendance of Witnesses and Production of Documents) Act, 1986

*(As modified upto 13th November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

2006

[किंमत रु. ३-००]

# महाराष्ट्र विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे) अधिनियम, १९८६

अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व व्याप्ती. | ३ |
| २. | ज्यांना अधिनियम लागू होईल त्यांची विभागीय चौकशी. | ३ |
| ३. | व्याख्या. | ४ |
| ४. | चौकशी प्राधिकाऱ्यास कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेला अधिकार वापरण्यास प्राधिकृत करणे. | ४ |
| ५. | साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्याचा प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्याचा अधिकार. | ५ |
| ६. | कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा जेथे वापर करता येईल त्या प्रादेशिक सिमा. | ७ |
| ६क. | कलमे ४, ५ व ६ यांच्या तरतुदी प्रारंभिक चौकशीला लागू करणे. | ७ |
| ७. | नियम करण्याचा अधिकार. | ७ |

# सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९[१]

[महाराष्ट्र विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे ) अधिनियम, १९८६]

[महाराष्ट्राचे राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २१ जुलै, १९८६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला].

**विभागीय चौकशीच्या वेळी साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विभागीय चौकशीच्या वेळी साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :--

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे) अधिनियम, १९८६ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

**२.** पुढील बाबींच्या संबंधात केलेल्या प्रत्येक विभागीय चौकशीस [२][किंवा कोणत्याही प्रारंभिक चौकशीस] या अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील. ज्यांना अधिनियम लागू होईल त्यांची विभागीय चौकशी.

(क) लोकसेवांमध्ये किंवा महाराष्ट्र राज्याच्या कारभाराशी संबंधित पदांवर नेमलेल्या व्यक्ती ;

(ख) कोणत्याही लोकसेवेमध्ये किंवा महाराष्ट्र राज्याच्या कारभाराशी संबंधित अशा पदावर नेमण्यात आलेल्या व्यक्ती ज्या--

(एक) महाराष्ट्र राज्यातील कोणतेही स्थानिक प्राधिकरण ;

(दोन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन करण्यात आलेले आणि राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या नियंत्रणाखालील (स्थानिक प्राधिकरण वगळून) कोणतेही महामंडळ ;

१९५६ चा १. (तीन) जिच्या भरणा झालेल्या भागभांडवलापैकी एक्कावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतके भाग-भांडवल राज्य शासनाने धारण केलेले असेल अशी, 'कंपनी अधिनियम, १९५६' याच्या कलम ६१७ च्या अर्थानुसार असलेली कोणतीही शासकीय कंपनी किंवा अशा शासकीय कंपनीची दुय्यम कंपनी असलेली कोणतीही कंपनी ;

१८६० चा २१. (चार) महाराष्ट्र राज्यास लागू केलेला 'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' या अन्वये नोंदलेली व राज्य शासनाच्या नियंत्रणाधीन असलेली कोणतीही संस्था ;

यांच्या सेवेमध्ये असतील किंवा त्यांच्याकडून वेतन घेत असतील.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, महाराष्ट्र शासन राजपत्र, १९८६, भाग ५, असाधारण, पृष्ठे २७९ पहा.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २ द्वारे, "विभागीय चौकशीस" या मजकुरानंतर, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

व्याख्या. ३. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,----

(क) "विभागीय चौकशी" याचा अर्थ, हा अधिनियम ज्याला लागू होतो अशा कोणत्याही व्यक्तीविरुध्द, सचोटीच्या अभावाबाबत केलेल्या कोणत्याही अभिकथनाच्या संबंधात---

(एक) राज्य विधानमंडळाने केलेला कोणताही कायदा किंवा त्याअन्वये केलेला कोणताही नियम याअन्वये आणि त्यानुसार केलेली कोणतीही चौकशी ; किंवा

(दोन) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये आणि त्यानुसार केलेली व अनुच्छेद ३१३ अन्वये चालू ठेवलेली कोणतीही चौकशी, असा आहे ;

(ख) "चौकशी प्राधिकारी" याचा अर्थ, [1][कोणतीही प्रारंभिक चौकशी करण्याचा ज्याचा उद्देश आहे किंवा अशी चौकशी करण्याचा ज्याला निदेश देण्यात आला आहे तो अधिकारी अथवा प्राधिकारी किंवा विभागीय चौकशीचे काम चालवण्यासाठी राज्य शासनाने किंवा त्या शासनास दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने अथवा प्राधिकाऱ्याने नेमलेला कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, असा आहे आणि त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा नियमाद्वारे अथवा त्या अन्वये, अशा चौकशीचे काम चालवण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ग) "सचोटीचा अभाव" यामध्ये लाचलुचपत अथवा भ्रष्टाचार किंवा अकृतीमधील किंवा कृतीमधील असद्‌भावपूर्वक केलेली कामे यांचा समावेश होतो ;

[2][(क-एक) "प्रारंभिक चौकशी" याचा अर्थ, कलम २ मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध विभागीय चौकशी करण्याचा आदेश देण्यासाठी सकृतदर्शनी संयुक्तिक बाजू अस्तित्वात आहे किंवा नाही यासंबंधीचा निर्णय घेणे संबंधित प्राधिकाऱ्याला शक्य व्हावे यासाठी, अशा व्यक्तीविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपांच्या सत्यतेविषयी किंवा खोटेपणाविषयी खात्री करून घेण्यासाठी महत्त्वाची तथ्ये व साक्षीपुरावा मिळविण्यासाठी केलेली चौकशी, असा आहे.]

(घ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

चौकशी प्राधिकाऱ्यास कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेला अधिकार वापरण्यास प्राधिकृत करणे.

४. कोणत्याही विभागीय चौकशीच्या वेळी, साक्षीदार म्हणून समन्स काढणे किंवा कोणत्याही व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या वर्गाकडून किंवा प्रवर्गाकडून दस्तऐवज मागवणे आवश्यक असेल त्या बाबतीत, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा, शासन सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने लेखी आदेशाद्वारे यासंबंधात चौकशी प्राधिकाऱ्यास प्राधिकृत केले तर, चौकशी प्राधिकाऱ्यास, विभागीय चौकशीच्या कोणत्याही टप्प्यावर अशा कोणत्याही व्यक्तीच्या अथवा अशा वर्गातील किंवा प्रवर्गातील व्यक्तीच्या संबंधात, कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करता येईल आणि विभागीय चौकशांच्या वेगवेगळ्या वर्गासाठी किंवा वर्गांसाठी किंवा राज्याच्या वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी असे वेगवेगळे अधिकारी नियुक्त करता येतील.

---

[1] सन १९९४चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९ याच्या कलम ३ (अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

१९०८ चा ५. ५. (१) कलम ४ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रत्येक चौकशी प्राधिकाऱ्याला (यात यापुढे ज्याचा निर्देश "प्राधिकृत चौकशी प्राधिकारी" असा केला आहे, पुढील बाबींच्या संबंधात, एखाद्या दाव्यात न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' या अन्वये जे अधिकार निहित केलेले असतील तेच अधिकार असतील ; त्या बाबी पुढीलप्रमाणे :-- साक्षीदारांना हजर राहण्यास आणि दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्याचा प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्याचा अधिकार.

(क) कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठवणे, हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) साक्षीपुरावा म्हणून सादर करण्यास योग्य असेल असा कोणताही दस्तऐवज किंवा इतर साहित्य शोधून काढण्यास व तो/ते सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रावर दिलेला साक्षीपुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडे किंवा कार्यालयाकडे कोणत्याही सरकारी अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्यास पुढील गोष्टी करण्याचा हक्क असणार नाही :-

१९७१ चा महा. ४६. (एक) लोकआयुक्त किंवा उप-लोकआयुक्त किंवा त्यांच्या कर्मचारीवर्गातील कोणतीही व्यक्ती यांनी, 'महाराष्ट्र लोकआयुक्त व उप-लोकआयुक्त अधिनियम, १९७१' याअन्वये कोणतीही चौकशी करीत असताना किंवा अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ मिळवलेल्या कोणत्याही माहितीच्या संबंधात कोणताही साक्षीपुरावा देण्यासाठी किंवा अशा माहितीच्या संबंधात त्यांनी नोंदवून घेतलेला किंवा मिळवलेला साक्षीपुरावा सादर करण्यासाठी त्यांना अशा प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्यापुढे उपस्थित होण्यास भाग पाडणे ;

१९५९ चा ३८. १९७० चा ५. १९८० चा ४०. (दोन) 'भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय स्टेट बँक, भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९' यांचे कलम २, खंड (ट) मधील व्याख्येप्रमाणे असलेली कोणतीही दुय्यम बँक किंवा 'बँकव्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७०' याच्या कलम ३ अन्वये किंवा 'बँकव्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८०' याअन्वये रचना केलेली अन्य कोणतीही समनुरूप नवीन बँक यांना, --

(क) भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय स्टेट बँक, दुय्यम बँक किंवा समनुरूप नवीन बँक जे गोपनीय स्वरूपाचे असल्याबद्दल दावा सांगील अशी कोणतीही लेखापुस्तके किंवा इतर दस्तऐवज सादर करण्याची ; किंवा

(ख) अशी कोणतीही पुस्तके किंवा दस्तऐवज विभागीय चौकशीच्या कार्यवाहीच्या अभिलेखांचा एक भाग बनवण्याची ; किंवा

(ग) अशी कोणतीही पुस्तके किंवा दस्तऐवज सादर करण्यात आल्यास, त्या प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्यापुढील कोणत्याही संबंधित व्यक्तीस किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस ते पाहण्यासाठी देण्याची, सक्ती करणे ;

(तीन) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास, त्याने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अशा प्राधिकाऱ्याच्या कर्तव्यांपैकी

किंवा कामांपैकी कोणतीही कर्तव्ये किंवा कामे पार पाडताना अथवा त्यांच्या प्रयोजनार्थ मिळवलेल्या आणि अशा कायद्यान्वये जी गोपनीय समजणे आवश्यक असेल अशा माहितीसंबंधीचा कोणताही साक्षीपुरावा देण्यासाठी प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्याची किंवा अशा माहितीच्या संबंधात त्याने (पूर्वोक्त अधिकाऱ्याने वा प्राधिकाऱ्याने) नोंदवलेला किंवा मिळवलेला साक्षीपुरावा सादर करण्याची सक्ती करणे.

(३) प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्याने कोणत्याही व्यक्तीवर बजावावयाचे साक्षीदाराचे प्रत्येक समन्स हे, पुढील बाबतीत 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' यातील आदेश पाच व आदेश सोळा यांमधील, समन्स बजावणीबाबतच्या सबंध्द तरतुदींना बाध न आणता, बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल :-- १९०८ चा ५.

(क) जिच्यावर समन्स बजावावयाचे ती व्यक्ती कंपनी असेल त्या बाबतीत, 'कंपनी अधिनियम १९५६' याच्या कलम ५१ च्या तरतुदींनुसार बजावणी करण्यात आली असेल तर ; १९५६ चा १.

(ख) जिच्यावर समन्स बजावावयाचे ती व्यक्ती भागीदारी संस्था असेल त्या बाबतीत, समन्स, त्या भागीदारी संस्थेला उद्देशून तिच्या कामकाजाच्या मुख्य ठिकाणच्या पत्त्यावर तिचे नाव आणि अभिधान यांचा उल्लेख करुन पाठवण्यात आले असेल आणि ते--

(एक) प्रेषण प्रमाणपत्रासह किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवण्यात आले असेल ; अथवा

(दोन) कामकाजाच्या उक्त ठिकाणी ठेवण्यात आले असेल तर ;

अशा रीतीने बजावलेले समन्स प्रत्येक भागीदारावर बजावण्यात आले असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) जिच्यावर समन्स बजावावयाचे ती व्यक्ती, सांविधानिक सरकारी संस्था किंवा महामंडळ किंवा सहकारी संस्था किंवा अन्य संस्था असेल त्या बाबतीत, ते समन्स त्या संस्थेचा, महामंडळाचा किंवा सहकारी संस्थेचा सचिव, कोषाध्यक्ष किंवा अन्य प्रमुख अधिकारी यास उद्देशून त्याच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवण्यात आले असेल आणि ते--

(एक) प्रेषण प्रमाणपत्रासह किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवण्यात आले असेल ; किंवा

(दोन) त्या कार्यालयात ठेवून देण्यात आले असेल ;

(घ) अन्य कोणत्याही प्रकरणी, समन्स ज्या व्यक्तीवर बजावावयाचे आहे तिला उद्देशून काढले असेल आणि,--

(एक) तिला ते देण्यात किंवा देऊ करण्यात आले असेल ; किंवा

(दोन) अशी व्यक्ती सापडली नाही तर, त्या व्यक्तीच्या अखेरच्या ज्ञात निवासस्थानाच्या किंवा व्यवसायाच्या एखाद्या पटकन लक्षात येईल अशा ठिकाणी ते लावण्यात आले असेल ; किंवा

(तीन) त्या व्यक्तीला प्रेषण प्रमाणपत्राद्वारे किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवण्यात आले असेल.

(४) कोणत्याही साक्षीदाराच्या उपस्थितीसाठी किंवा कोणतीही कागदपत्रे दाखल करून घेण्यासाठी प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्याने काढलेली कोणतीही आदेशिका, आवश्यक वाटल्यास, बृहन्मुंबईत मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्यामार्फत बजावण्यात येईल आणि अन्यत्र, साक्षीदार किंवा ज्या व्यक्तीवर आदेशिका बजावण्यात यावयाची आहे ती व्यक्ती जेथे स्वेच्छेने राहात असेल किंवा व्यवसाय करीत असेल किंवा फायद्यासाठी व्यक्तिशः काम करीत असेल त्या स्थानिक सीमा ज्या जिल्हा न्यायाधीशांच्या अधिकार क्षेत्रात येतील

त्याच्यामार्फत बजावण्यात येईल आणि अशा कोणत्याही आदेशिकेची अवज्ञा केल्याबद्दल करावयाच्या कोणत्याही कारवाईसाठी अशी प्रत्येक आदेशिका ही मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई किंवा, यथास्थिति, जिल्हा न्यायाधीश यांच्यामार्फत दिली असल्याचे मानण्यात येईल.

१९७४ चा २. (५) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' च्या कलम ३४५ व ३४६ च्या प्रयोजनांसाठी कोणतीही विभागीय चौकशी करणारा प्रत्येक प्राधिकृत चौकशी प्राधिकारी हा, दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

१८६० चा ४५. (६) कोणतीही विभागीय चौकशी करणाऱ्या प्रत्येक प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्यापुढील कोणतीही कार्यवाही भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ च्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

**६.** कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्येक प्राधिकृत चौकशी प्राधिकाऱ्याची प्रादेशिक अधिकारिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यापर्यंत विस्तारित राहील. कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा जेथे वापर करता येईल त्या प्रादेशिक सिमा.

[1][६-क. कलमे ४, ५ व ६ यांच्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह प्रारंभिक चौकशीला लागू होतील अशा प्रारंभिक चौकशीचा उद्देश असलेला किंवा तशी चौकशी करण्याचा निदेश देण्यात आलेला चौकशी प्राधिकारी, विभागीय चौकशी करणारा चौकशी प्राधिकारी ज्या अधिकारांचा वापर करतो त्याच अधिकारांचा वापर करील.] कलमे ४, ५ व ६ यांच्या तरतुदी प्रारंभिक चौकशीला लागू करणे.

**७.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी फी आकारण्याची आणि अशी कोणतीही फी किंवा त्यापैकी काही भाग परत करण्यासाठी अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल. नियम करण्याचा अधिकार.

(२) असे नियम प्रथमच करण्यात येतील त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहून केले जातील.

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमांत कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमांन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ४ द्वारे, हे कलम दाखल करण्यात आले.

एच ६५-६०८२ पु.-१२.०६.

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.